मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# “चिंचवडमधून शंकर जगताप यांना उमेदवारी द्या..” आमदार अश्विनी जगताप

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी..! : चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या जगताप कुटुंबातील गृहकलह मिटला

**पिंपरी | प्रतिनिधी**

“चिंचवडमधून शंकर जगताप यांना उमेदवारी द्या..” अशी मागणी आमदार अश्विनी जगताप यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या जगताप कुटुंबातील गृहकलह मिटला असून शंकर जगताप यांच्या उमेदवारीचा मार्ग एक प्रकारे मोकळा झाला आहे.



चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी जगताप यांनी शंकर जगताप यांच्यासमवेत भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची काल पुण्यात भेट घेतली आहे. यावेळी त्यांच्यासोबत दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांची कन्या ऐश्वर्या रेणुसे या देखील उपस्थित होत्या. “माझ्या ऐवजी भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांना चिंचवड मधून उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी आमदार अश्विनी जगताप यांनी केली असल्याची माहिती मिळत आहे.

शंकर जगताप हे अश्विनी जगताप यांचे दीर आहेत. दोघांमध्ये चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या उमेदवारी वरुन अंतर्गत वाद सुरु असल्याचे बोलले जात होते. अखेर आमदार अश्विनी जगताप यांनी माघार घेत दीर शंकर जगताप यांचा विधानसभा निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा केला आहे. या घडामोडींमुळे जगताप कुटुंबातील वाद मिटला असून उमेदवारीवरून भाजपची सुरू असलेले डोकेदुखी दूर झाली असल्याचे बोलले जात आहे.

# शाळेतील कर्मचाऱ्याने केले अल्पवयीन विद्यार्थिनींचे लैंगिक शोषण

## फुगेवाडीच्या शाळेतील एका कर्मचाऱ्याने अश्लील शोषण केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेने खासगी संस्थेला चालविण्यास दिलेल्या फुगेवाडीच्या एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींचे शाळेतील एका कर्मचाऱ्याने अश्लील शोषण केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. तसेच शाळेतील एका विद्यार्थिनीचा तिच्या घरापर्यंत पाठलाग केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



शाळेच्या मुख्याध्यापकांनी याप्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दिली असून, सरफराज मन्सूर शेख (वय ३२, रा. कोंढवा पुणे) याच्यावर बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेख हा शाळेतील ॲडमिन ऑफिसमध्ये काम करतो. त्याने ऑगस्ट ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत मुलींचे लैंगिक शोषण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. शाळेतील १३ वर्षीय मुलीने मुख्याध्यापकांना १५ ऑक्टोबर रोजी भेटून शेख याने बॅड टच केल्याचे सांगितले. तसेच माझ्याप्रमाणे १५ वर्षीय एका मुलीबाबत देखील शेख याने असाच प्रकार केल्याचेही पीडित मुलीने मुख्याध्यापकांना सांगितले.

या दोन घटनांबरोबरच शेख याने एका मुलीचा तिच्या घरापर्यंत पाठलाग केल्याचेही माहिती पीडित मुलीने मुख्याध्यापकांना दिल्यावर त्यांनी तात्काळ भोसरी पोलीस ठाणे गाठून अधिकाऱ्यांना घडलेल्या प्रकाराबाबत हकीकत सांगितली. त्यानंतर पोलिसांनी याप्रकरणी शेख याच्यावर गुन्हा दाखल केला असून, त्याचा सध्या शोध घेतला जात आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने दोनच महिन्यांपूर्वी संबंधित इंग्रजी माध्यमिक शाळा एका खासगी संस्थेला चालविण्यास दिली आहे. या शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची निवड आणि भरती प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी संबंधित संस्थेला दिली आहे. तसेच शाळेचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालविणे ही जबाबदारी देखील संस्थेची असून, दोनच महिन्यांपूर्वी संस्थेकडे कारभार सोपविला असताना वरील धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# कोंडीची ठिकाणे निश्चित; अधिक पोलिस नेमण्यावर भर

## वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आयुक्तालयाच्या हद्दीतील 143 पॉइंट निश्चित केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत काही ठिकाणी सतत वाहतूक कोंडी होत असते. वाहनांच्या दूरपर्यंत रांगा लागल्याने या कोंडीत वाहनचालक अडकून पडतात. यामुळे वेळ वाया जाण्यासह वाहन चालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलिसांच्या वाहतूक विभागाने १४३ पॉइंट निश्चित करून त्याठिकाणी अधिक कर्मचारी नेमण्यासह इतरही नियोजन करण्यावर भर दिला आहे.

पिंपरी-चिंचवड ही औद्योगिकनगरी असून येथे अनेक कारखान्यांसह हिंजवडी, तळवडे आयटी पार्क, देहू-आळंदी तीर्थक्षेत्र, नामांकित शाळा, महाविद्यालये या हद्दीत आहेत. त्यामुळे वाहनांची संख्याही अधिक असते. बेशिस्त वाहनचालक, रस्त्यालगतची अतिक्रमणे आदी कारणांमुळे सकाळी व सायंकाळी अनेक रस्त्यावर वाहतूक कोंडी होते. या कोंडीमुळे वाहन चालकांना मनस्ताप होतो. दरम्यान, ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. सतत वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करून वाहतूक कोंडी फोडण्यासाठी काय करता येईल, याची चाचपणी केली आहे.



### वाहतूक विभागनिहाय कर्मचारी नेमलेले पॉइंट

| | | | |
|---|---|---|---|
| » बावधन - ७ | » तळवडे - १२ | » पिंपरी - ११ | » देहूरोड - ९ |
| » तळेगाव - ९ | » निगडी - १० | » हिंजवडी - ९ | » दिघी-आळंदी-११ |
| » चिंचवड - ७ | » म्हाळुंगे -१० | » भोसरी - १३ | |
| » सांगवी - ११ | » वाकड - १३ | » चाकण - ११ | |

### वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पाहणी

» वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना राबविण्याबाबत पोलिस आयुक्तांसह इतरही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी विविध ठिकाणी भेट देत सूचना केल्या आहेत. त्यानुसार १४३ पॉइंट निश्चित करून याठिकाणी कर्मचारी नेमण्यासह काही ठिकाणच्या मार्गातही बदल करण्यात आला आहे. एकेरी वाहतूक करण्यासह इतरही उपाययोजना राबवल्या आहेत.

“काही ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्यासह वाहतूक कोंडी न होता, सुरळीत वाहतूक ठेवण्याच्या दृष्टीने आयुक्तालयाच्या हद्दीतील काही पॉइंट निश्चित केले आहेत. या पॉइंटवर अधिकाधिक कर्मचारी नेमण्यात आले आहेत. या पॉइंटवर अधिक लक्ष ठेवले जाणार आहे.

- बापू बांगर, पोलिस उपायुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड.

# अकरावीच्या तब्बल 42 हजार जागा रिक्त

## कोचिंग क्लासच्या 'टायअप' मुळे 343 कनिष्ठ महाविद्यालयांमधील स्थिती आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जेईई, नीट आणि एमएच-सीईटीच्या पूर्वतयारीसाठी खासगी कोचिंग क्लासशी 'टाय-अप' असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशाला पालकांकडून पहिली पसंती दिली जात असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. यामुळे अकरावी, बारावी वर्गात केवळ प्रात्यक्षिक परीक्षेपुरते हजर राहण्याची प्रथा पडली आहे. परिणामी दरवर्षीप्रमाणे महापालिका हद्दीबाहेरील शेकडोच्या संख्येतील क्लासच्या माध्यमातून 'टाय-अप' महाविद्यालयांमध्ये प्रवेश वाढत आहेत. या कारणांमुळे केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत (कॅप) होणाऱ्या अकरावी प्रवेशाच्या सुमारे ४२ हजार १८७ जागा रिक्त राहिल्या आहेत. तब्बल ३४.९२ टक्के जागा रिक्त राहिल्या आहेत.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील ३४३ कनिष्ठ महाविद्यालयांमधील एकूण एक लाख २० हजार ८०५ जागांपैकी केवळ ६५.०८ टक्के जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत.



### जागा रिक्त राहण्याची कारणे

- खासगी क्लासशी 'टाय-अप' असणाऱ्या कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याला पसंती
- वर्गात हजेरीचा आग्रह नसणाऱ्या पालिका क्षेत्राबाहेरील कॉलेजना प्राधान्य
- कनिष्ठ महाविद्यालयांकडून अतिरिक्त तुकड्या, जागांना घेतलेली मान्यता
- अकरावीपेक्षा पदविका, आयटीआयकडे वाढता ओढा

त्यामुळे ३४.९२ टक्के जागा रिक्त आहेत. आता माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने अकरावीच्या प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे केंद्रीय प्रवेश समितीच्या सदस्य सचिव आणि साहाय्यक शिक्षण संचालक डॉ. ज्योती परिहार यांनी सांगितले.

अकरावी प्रवेशासाठी एक लाख तीन हजार ८३९ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली होती. कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये एकूण एक लाख २० हजार ८०५ जागा उपलब्ध होत्या. आतापर्यंत ७८ हजार ६१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत, तर सुमारे ४२ हजार १८७ जागा रिक्त आहेत. या प्रक्रियेत सहभागी झालेल्या तब्बल १५ हजार ९४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नसल्याचे निदर्शनास आले आहे. 'कॅप'अंतर्गत एकूण एक लाख चार हजार १६० जागा रिक्त होत्या. या जागांवर ६९ हजार २१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. 'कॅप' फेरीतील ३४ हजार ९४२ जागा अद्याप रिक्त आहेत.

गेल्या काही वर्षांपासून विद्यार्थी अकरावी प्रवेश प्रक्रियेकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गेली काही वर्षे 20 ते 25 हजार जागा रिक्त राहत होत्या. परंतु, गेल्या वर्षी 30 हजारांहून अधिक आणि यंदा 42 हजारांवर जागा रिक्तच राहिल्याचे स्पष्ट झाले आहे. यासंदर्भात शिक्षण विभागातील अधिकारी म्हणाले, शहरात अकरावी प्रवेशासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली असून जेईई मेन्स, नीट, सीईटी आदी परीक्षांची तयारी करण्यासाठी विद्यार्थी ग्रामीण भागातच शिकण्यास प्राधान्य देत आहेत. तसेच, आयटीआय किंवा पॉलिटेक्निक प्रवेशाला विद्यार्थी प्राधान्य देत आहेत. त्यामुळे अकरावी प्रवेश प्रक्रियेतील जागा रिक्त राहिल्या आहेत. प्रवेश प्रक्रिया संपल्यात जमा आहे. तरीदेखील काही तांत्रिक कारणास्तव काही विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सामावून घेतले जाईल. परंतु, यापुढे प्रवेशासाठी कोणतीही फेरी आयोजित केली जाणार नसल्याचे उपसंचालक कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

> कनिष्ठ महाविद्यालयांनी अतिरिक्त तुकड्यांना मान्यता घेतल्या आहेत. त्यामुळे प्रवेशासाठी उपलब्ध जागांची संख्या जास्त आहे. परिणामी रिक्त जागांची संख्याही तुलनेने अधिक दिसत आहे. तसेच विद्यार्थ्यांचा कल हा पदविका, आयटीआयमध्ये प्रवेश घेण्याकडेही आहे. त्यामुळेही केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील जागा रिक्त राहात आहेत.
>
> **- डॉ. ज्योती परिहार,** साहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय (पुणे).

# पुणे महानगर प्रादेशिक विकास आराखड्यात केला बदल

## न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये निर्णय झाल्याने व्यक्त केले जातेय आश्चर्य, महानगर नियोजन समितीची बैठक झाली नसल्याचा परिणाम

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रादेशिक आराखड्यात नियोजन समितीच्या परस्पर बदल होत असून या प्रकारामुळे समितीच्या अधिकारांना बाधा होत असल्याचा आरोप समिती सदस्यांकडून करण्यात येत आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असूनही त्यात बदल न करण्याचे स्पष्ट आदेश देऊ नये टीपी स्कीम आणि अग्निशमन विभागाच्या जागा घेण्यात येत आहेत. या विरोधात नियोजन समितीने आक्षेप घेतला. दरम्यान, आचारसंहिता लागू झाल्यानंतर सर्व कामे अडकून पडलेली आहेत.

पुणे महानगर क्षेत्रासाठी शासनाने १९९७ मध्ये संपूर्ण पुणे जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रासाठी मंजूर केलेली प्रादेशिक योजना फेब्रुवारी १९९८ पासून अमलात आहे. राज्य शासनातर्फे नियुक्त केलेल्या छाननी समितीकडून या प्रादेशिक आराखड्यात बदल केले जात आहेत. पुणे महानगर नियोजन समितीच्या ठरावाशिवाय हे बदल करण्यात येत असून, ही बाब अयोग्य असल्याचे सांगत नियोजन समिती सदस्यांनी आक्षेप घेतला आहे. त्यासाठी नियोजन समितीची त्वरित बैठक घेण्यात यावी अशी मागणी केली होती. मात्र आता आचारसंहिता लागू झाल्याने ही बैठक होणे शक्य नाही. परिणामी आता पुढच्या येणाऱ्या नव्या सरकारच्या काळातच त्यामध्ये अपेक्षित निर्णय होऊ शकणार आहे. पुणे महानगर क्षेत्रासाठीचे नियोजन पुणे महानगर नियोजन समितीमार्फत करणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा प्रकरणांची माहिती नियोजन समितीस मंजुरीसाठी सादर होण्याबाबत धोरण ठरविणे आवश्यक असल्याचे नियोजन समिती सदस्यांची मागणी आहे. पुणे महानगर क्षेत्रासाठीच्या नियमावलीमध्ये देखील शासनाकडून वेळोवेळी बदल केले जातात. त्याची माहिती नियोजन समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. मात्र, शासनाकडून देखील त्याची माहिती समितीला देण्यात येत नाही.



### नियोजन समितीची बैठक पुन्हा लांबली

- नियोजन समितीच्या सदस्यांनी येत्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लवकर बैठक घ्यावी अशी मागणी पीएमआरडीए अध्यक्ष तथा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती. मात्र त्या पत्राला कोणती उत्तर नगर विकास विभागाने दिले नाही. परिणामी, नियोजन समितीची बैठक पुन्हा लांबणीवर पडलेली आहे. त्यामुळे आता प्राधिकरणाचे प्रश्न आणि समितीचे काही आक्षेप नोंदवणे बाकी राहिले आहे.

> पुणे महानगर प्रादेशिक आराखड्यात बदल करण्याचे अधिकार महानगर नियोजन समितीकडे आहेत. मात्र, तरीही आराखड्यात परस्पर बदल केले जात आहेत. त्याबाबत नियोजन समितीला माहिती दिली जात नाही. आता पुन्हा आचारसंहिता लागू झाल्याने पुन्हा बैठकीचा निर्णय लांबणीवर पडलेला आहे.
>
> **- वसंत भसे, सदस्य, पुणे महानगर नियोजन समिती.**

# मोरेश्वर भोंडवे यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

## उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून पक्षात प्रवेश



**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचा बालेकिल्ला अर्थात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा धक्का बसला आहे. अजित पवारांचे कट्टर समर्थक मोरेश्वर भोंडवे यांचा त्यांची साथ सोडत थेट शिवसेनेत प्रवेश केला आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून घेत मोरेश्वर भोंडवे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यांच्या समवेत चिंचवड मतदार संघातील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

चिंचवडमधून विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले राष्ट्रवादीचे (अजित पवार) पक्षाचे माजी नगरसेवक, शहर कार्याध्यक्ष मोरेश्वर भोंडवे यांनी शिवसेना (ठाकरे) पक्षात प्रवेश केला. त्यामुळे शहर राष्ट्रवादीला हा धक्का असल्याचे मानले जात आहे.

# विधानसभा निवडणूक, प्रशासन लागले तयारीला

## कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या : आचारसंहिता लागली, कामकाजाला सुरुवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा करताच पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्ही विधानसभा मतदारसंघात प्रशासनाकडून कामकाजाला सुरुवात केली आहे. सध्या विविध आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना विधानसभेच्या कामकाजांचे वाटप करण्याचे काम सुरू आहे.

शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघातील १६ लाख ३४ हजार ७६८ मतदारांसाठी १४४२ मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. तसेच तिन्ही मतदारसंघातील मतदान यंत्रे ठेवण्यासाठी जागा निश्चित केल्या आहेत. मतदान यंत्रे आली की त्यांची तपासणी करण्यात येणार आहे. शहरातील तिन्ही विधानसभा निवडणुकीची मतदार यादी अंतिम झाली आहे. मतदानाची केंद्रेही निश्चित आहेत. मतदान यंत्रांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. मतदानाच्या दृष्टीने आवश्यक तयारी झाली आहे. दरम्यान, महापालिकेचे अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी सोडून इतर विभागातील ५० टक्के कर्मचारी निवडणुकीच्या कामांसाठी वर्ग करण्यात येणार आहे. सध्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहेत. त्या पूर्ण झाल्या की कामकाजाला सुरुवात होईल, असेही अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.



### फिरती तसेच स्थिर सर्वेक्षण पथके

भोसरी विधानसभेतील आदर्श आचारसंहिता, फिरती सर्वेक्षण पथके (एफएसटी) आणि स्थिर सर्वेक्षण पथके (एसएसटी), निवडणुकीतील पैशाचा वापर, अमली पदार्थ, मद्य, मौल्यवान धातू यांची जप्ती यासाठीची यंत्रणा, निवडणूक प्रचारासाठी करण्यात येणाऱ्या जाहिरातींचे प्रमाणीकरण, निवडणुकीसाठी केलेल्या व्हीएचए, सी- व्हिजिल, केवायसी, सुविधा पोर्टल आदी संगणकीय व्यवस्था, उपयोजके (ॲप्लिकेशन्स) यांची तयारी पूर्ण झाली आहे. तसेच मतदारसंघात एक महिला, दिव्यांग, युवा संचालित, संकल्पना आधारित विशेष मतदान केंद्रे, आदर्श मतदान केंद्रे असणार आहेत, अशी माहिती भोसरी विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी रेवणनाथ लबडे यांनी दिली आहे.

### मतदान यंत्रांची तपासणी

**» शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघासाठी मतदान यंत्रे मागवण्यात आली असून विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर यंत्रांची तपासणी पूर्ण करण्यात येणार आहे. यामध्ये मतदान यंत्रणाची प्रथमस्तरीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमोर मतदान यंत्रणावर मतदानाचे प्रात्यक्षिक घेण्यात येणार आहे.**

### मतदारसंघनिहाय आकडेवारी

| मतदारसंघ | एकूण लोकसंख्या | मतदान केंद्रे |
|---|---|---|
| » चिंचवड | ६ लाख ५० हजार ७०९ | ५६१ |
| » पिंपरी | ३ लाख ८७ हजार ७ | ३९८ |
| » भोसरी | ५ लाख ९७ हजार ५२ | ४८३ |

# रस्तोरस्ती दादा, भाऊ, शेठचेच दर्शन

## आचारसंहिता लागून 48 तास उलटल्यावरही फ्लेक्स, फलक निघेनात : प्रशासनाकडून कारवाईचा केवळ देखावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आचारसंहिता लागू करून ४८ तास झाले आहेत. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यानंतरही पिंपरी, चिंचवड आणि भोसरीच्या विधानसभा मतदारसंघात विविध रस्त्यांवर, चौकाचौकात, गल्लोगल्ली लावण्यात आलेले राजकीय पक्षांच्या नेत्यांचे जाहिरात फलक 'जैसे थे' आहेत. आचारसंहिता जाहीर झाल्यावर महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाला शहरभर लावण्यात आलेले बेकायदा फ्लेक्स काढताना दमछाक होत आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर गेल्या काही दिवसांपासून राजकीय पक्षांच्या नेत्यांचे जाहिरात फलक चौकाचौकात आणि महत्त्वाच्या रस्त्यांवर लावण्यात आले आहेत. विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून इच्छुकांनी देखील चमकोगिरी केली आहे. शहरात सत्ताधारी पक्षासह विरोधी पक्षाकडून बेकायदा बॅनर, फ्लेक्स लावले आहेत. प्रत्येक विद्युत पोल, सिग्नल, चौकात अनधिकृत बॅनर, फ्लेक्स भरगच्च झाला आहे. महापालिकेतील सत्ताधारी पक्षासह सर्वच पक्षांचे बॅनर-फलक लागले आहेत. शहरात मुख्य व अंतर्गत रस्ते, चौका-चौकात, सिग्नल, शाळा-कॉलेज परिसर अशा प्रत्येक ठिकाणी बॅनर, फ्लेक्स लागले होते.



विधानसभेची आचारसंहिता सुरू झाल्यानंतर शहरभर लावण्यात आलेल्या या राजकीय पक्षाच्या बेकायदा फ्लेक्सवर कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, आकाशचिन्ह विभागासह क्षेत्रीय कार्यालयाकडून कारवाईचा वेग पाहता हे फ्लेक्स कधी काढणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

### महापालिकेच्या महसुलावर पाणी

**» विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर बहुतांश राजकीय पक्षाच्या इच्छुकांकडून जागोजागी फ्लेक्स, फलक लावण्यात आलेले आहेत. विधानसभा मतदारसंघात स्वतःच्या नावाची चर्चा व्हावी यासाठी तीर्थयात्रा, आरोग्य शिबिर, दिवाळी फराळ वाटप यासह अन्य प्रकारचे उपक्रम घेतले जात आहेत. हे फ्लेक्स लावताना महापालिकेची कोणतीही परवानगी घेतली नसल्याने महापालिकेच्या उत्पन्नावर देखील परिणाम झाला आहे. काही चौकांमध्ये तर मोठ्या आकारातील हे बेकायदा जाहिरात फलक लावण्यात आल्याने वाहतूक नियंत्रण दिवे तसेच माहितीचे फलकदेखील झाकून गेले आहेत.**

> शहरातील सर्व राजकीय व अन्य बेकायदा जाहिरातींचे सर्व फलक गुरुवारी सायंकाळपर्यंत काढून टाकण्यात यावेत. याबाबतच्या सूचना आकाशचिन्ह विभागाच्या उपायुक्तांसह क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार सर्वच प्रभागात फ्लेक्स, फलक काढण्यात येत आहेत.
>
> **- चंद्रकांत इंदलकर, अतिरिक्त आयुक्त, महापालिका.**

# चार जागांवरून महाविकास आघाडीत तिढा

## शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात त्यावरून रस्सीखेच सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीमध्ये शहरातील चार मतदारसंघांवरून तिढा निर्माण झाल्याचे चित्र आहे. शिवसेना (ठाकरे) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात त्यावरून रस्सीखेच सुरू झाली आहे. हडपसर, वडगावशेरी, पर्वती आणि खडकवासला मतदारसंघावरून महाविकास आघाडीत अद्यापही एकमत झालेले नाही.



शिवसेना (ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार) आणि काँग्रेस, महाविकास आघाडी म्हणून एकत्रित निवडणूक लढविणार आहे. विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, महाविकास आघाडीचे जागा वाटप येत्या दोन दिवसांत निश्चित होणार आहे. मात्र, शहरातील काही जागांबाबतचा पेच कायम आहे.

शहरात आठ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी कसबा, कोथरूड, शिवाजीनगर आणि पुणे कॅन्टोन्मेंट या चार विधानसभा मतदारसंघांबाबत महाविकास आघाडीचे एकमत झाले आहे. कसबा, शिवाजीनगर आणि पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघ काँग्रेसला मिळणार आहेत. कसब्यात काँग्रेसचे रवींद्र धंगेकर विद्यमान आमदार आहेत, तर शिवाजीगर आणि पुणे कॅन्टोन्मेंट या दोन्ही मतदारसंघात गेल्या निवडणुकीत काँग्रेसने तुल्यबळ लढत दिली होती. कोथरूड मतदारसंघ शिवसेनेला (ठाकरे) मिळणार असल्याचे निश्चित आहे.

शिवसेनेकडून (ठाकरे) हडपसर आणि वडगावशेरी मतदारसंघावरही दावा केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला ही मागणी अमान्य आहे, तर आघाडीच्या जागावाटपात काँग्रेसकडून पर्वती मतदारसंघाचीही मागणी करण्यात आली आहे. हडपसरच्या बदल्यात शिवसेनेला (ठाकरे) पर्वती मतदारसंघ देण्याची राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाची तयारी आहे. मात्र, काँग्रेसला हा मतदारसंघ हवा असल्याने पर्वती मतदारसंघावरूनही तिढा निर्माण झाला आहे. वडगावशेरीवर काँग्रेसने दावा केलेला नाही. मात्र, शिवसेनेकडून (ठाकरे) वडगावशेरी नाही, तर खडकवासला मतदारसंघ द्यावा, असा आग्रह धरण्यात आला आहे. त्यामुळे या चार मतदारसंघांचा पेच कायम आहे. उमेदवारी न मिळाल्यास भेगडे अपक्ष लढतील किंवा राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात जातील, अशी चर्चा सुरू झाली आहे.

> गेल्या ३० वर्षांपासून राजकीय जीवनात सक्रिय आहे. पक्षाने दिलेली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली आहे. यापूर्वीच्या निवडणुकीत मला प्रत्येक वेळी थांबविण्यात आले. मात्र, या वेळी मलाच संधी मिळेल.
> – श्रीनाथ भिमाले.

### समाजवादी पक्ष नाराज

अपेक्षेनुसार जागा सोडण्यात येत नसल्याने समाजवादी पक्षात नाराजी आहे. पक्ष एक किंवा दोन जागांवर समाधान मानणार नाही. पक्षाला अपेक्षेनुसार जागा वाट्याला न आल्यास वेगळा लढण्याचा विचार होऊ शकतो, असा इशारा आमदार अबू आसिम आझमी यांनी दिला. यावर समाजवादी पक्षाला योग्य प्रतिनिधित्व दिले जाईल, असे विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

### आम आदमी पक्षात गोंधळ

विधानसभा निवडणूक लढवू नये, असे आम आदमी पक्षात मतप्रवाह आहे. पण राज्यातील नेत्यांनी काही जागा तरी लढल्या पाहिजेत, असा आग्रह धरला आहे. पक्षाचा अद्याप काहीही निर्णय झालेला नाही, असे पक्षाच्या नेत्या प्रीती शर्मा-मेनन यांनी स्पष्ट केले.

> पक्षाकडे कोणतेही पद किंवा महामंडळ मागितले नव्हते. केवळ उमेदवारी मागितली असून, त्यासाठी मी आग्रही आहे.
> – बापूसाहेब भेगडे

# पुणे-मुंबई रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम कासवगतीनेच!

## वाहतूक पोलिसांचे लक्ष केवळ पावत्या फाडण्याकडेच : रस्त्यावर विक्रेत्यांचे अतिक्रमण

**पुणे | प्रतिनिधी**

भूसंपादनाअभावी सहा वर्षे रखडलेल्या खडकी कॅन्टोन्मेंट हद्दीतील जुन्या पुणे-मुंबई रस्त्याच्या रुंदीकरणाचे महापालिकेने हाती घेतलेले काम कासवगतीने सुरू आहे. त्यातच रस्त्याच्या कडेला फळे आणि इतर वस्तूंची विक्री करणाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे.



पुणे व पिंपरी चिंचवड शहरासाठी जुना मुंबई-पुणे महामार्ग हा महत्त्वाचा रस्ता आहे. पिंपरी हद्दीत दापोडीपर्यंत रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण झाले. परंतु, पुणे महापालिका हद्दीत खडकी कॅन्टोन्मेंटच्या हद्दीमध्ये भूसंपादनाअभावी 2.1 किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे रुंदीकरण होऊ शकले नव्हते. हा रस्ता अंडी उबवणी केंद्रापासून ते संत तुकाराम महाराज पुलापर्यंत (हॅरिस ब्रीज) 42 मीटर रुंदीचा रस्ता अपेक्षित आहे. त्यानुसार महापालिकेने 2016 मध्ये निविदा प्रक्रिया राबविली होती. या रस्त्याच्या कडेला बोपोडीत राहाणाऱ्या नागरिकांचे पुनर्वसन करण्यात आले. परंतु, खडकी रेल्वे स्टेशनपासून रेंजहिल्स चौकापर्यंत रस्त्याच्या कडेची जागा संरक्षण विभागाकडून मिळत नव्हती.

त्यामुळे रस्ता रुंदीकरण रखडले होते. परिणामी, येथील 21 मीटर रुंदीच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. सहा वर्षांनंतर एप्रिल 2022 मध्ये लष्कराने रस्त्याची जागा महापालिकेच्या ताब्यात दिली. महापालिकेने रुंदीकरणासाठी निविदा काढून नोव्हेंबर 2022 मध्ये कामही हाती घेतले. स. नं. 105 येथील पंजाब हॉटेल आणि जयहिंद चित्रपटगृहाची जागाही महापालिकेच्या ताब्यात आल्याने रस्ता रुंदीकरणाचे सर्वच अडथळे दूर झाले आहेत. त्यामुळे रस्ता रुंदीकरणाचे काम गतीने होणे अपेक्षित होते. काम पूर्ण करण्यासाठी दिलेली मुदत दीड महिन्याने संपत आहे. मात्र, अद्यापही अनेक ठिकाणी कामे अर्धवटच आहेत. रस्ता दुभाजक, पदपथ, साइडपट्ट्या आदी कामे होणे बाकी आहे.

सध्याचा कामाचा वेग पाहता ही सर्व कामे पुढील दीड महिन्यात पूर्ण होण्याची थोडीही शक्यता नाही. त्यामुळे संबंधित ठेकेदाराने मार्चपर्यंत काम करण्यास मुदतवाढ देण्याची मागणी केल्याचे पथ विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### वाहतुकीला अडसर

**» रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू असल्याने जेसीबी व इतर वाहने उभी असतात. रस्त्यावर जागोजागी सिमेंट ब्लॉक, रस्ता दुभाजकाचे साहित्य आहे. असे असताना अस्तित्वात असलेल्या रस्त्याकडेला मोठ्या प्रमाणात विविध प्रकारची फळे, कव्हर, कपडे, बेडशीट, लोड, टोप्या, गॉगल, खेळणी, टेडीबेअर आदी विक्रेते अतिक्रमण करून आपले व्यवसाय थाटतात. हे व्यावसायिक हातांमध्ये फळे व कर्णकर्कश स्पीकर घेऊन रस्त्यावर उभे राहतात. या वस्तू घेण्यासाठी वाहनचालक आपल्या गाड्या थांबवतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो.**